नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन आदेश, क्र.पदोन्न-३०२२/प्र.क्र.२०६/ई-३

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक:- २० एप्रिल, २०२३.

**संदर्भ:-**

१. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.सेवाज्ये-२०२२/प्र.क्र.१२७/ई-९, दि.१७.०८.२०२२.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१.०८.२०१९.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या.१२, दि.१५.१२.२०१७.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१.
५. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४.०७.२०२१.

**शासन आदेश:-**

नायब तहसिलदार संवर्गाची दि.०१.०१.२०१५ ची एकत्रित अंतिम सेवाज्येष्ठता यादी संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१७.०८.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर सेवाज्येष्ठता यादीच्या आधारे निवडसूची वर्ष २०२२-२३ मध्ये सरळसेवा कोट्यातील रिक्त पदांवर व प्रतिनियुक्तीमुळे रिक्त असलेल्या पदांवर नायब तहसीलदार गट-ब (वेतनश्रेणी एस-१४-३८६००-१२२८००) संवर्गातील अधिकाऱ्यांना तहसीलदार (गट-अ) (वेतनश्रेणी एस-१९-५५१००-१७५१००) या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती. तथापि, उक्त ज्येष्ठतासूची ही नायब तहसिलदार संवर्गाच्या नियमितीकरणाच्या अधीन आहे. त्यानुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, तहसिलदार संवर्गाच्या अंतिम ज्येष्ठतासूचीसंदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या मूळ अर्ज क्र.३३९/२०२० मधील अवमान याचिका क्र.६९/२०२२ मध्ये नियमितीकरणासंदर्भातील बाबी मा.न्यायाधिकरणासमोर उपस्थित झाल्या होत्या. सदर नियमितीकरणाच्या प्रक्रियेत अव्वल कारकून/ मंडळ अधिकारी यांच्यापासून सर्व पदोन्नत महसूल संवर्गातील अधिका-यांचा समावेश आहे. सदर नियमितीकरणाची प्रक्रिया विचारात घेऊन मा.न्यायाधिकरणाने दि.२१/०२/२०२३ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत.

8 (2) The Promotions in future, shall be subject to giving deemed date of promotion to the present applicants.

Scanned with CamScanner

(3) We make it clear that if the juniors to the applicants are promoted and if after giving the deemed date of seniority whatever effect, it will subject to the outcome of this O.A.

(4) The Respondent state is directed to communicate this order to all the concern officers whoseever is promoted. The promoted persons may be demoted after fixing the final seniority list based on the deemed date.

२. मा.न्यायाधिकरणाचे उक्त आदेश विचारात घेऊन खालील तक्त्यात दर्शविलेल्या नायब तहसीलदार गट-ब (वेतनश्रेणी एस-१४-३८६००-१२२८००) संवर्गातील अधिकाऱ्यांना तहसीलदार (गट-अ) (वेतनश्रेणी एस-१९-५५१००-१७५१००) या संवर्गात तहसिलदार संवर्गातील सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे व प्रतिनियुक्तीमुळे रिक्त असलेल्या पदांवर, सन २०२२-२०२३ च्या निवडसूची करीता या आदेशात नमूद अटी/ शर्तींच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | ज्ये. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | नियुक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | ५४०४ | डॉ.क्षितीजा दगडूबा वाघमारे | अ.जा. | सरळसेवा |
| २. | ५४१६ | श्रीमती मोहनमाला विष्णु नाझीरकर (श्रीमती मोहनमाला रमेश शिपकुले) | भ.ज.(क) | सरळसेवा |
| ३. | ५४१८ | श्री. घोरपडे कपील तुकाराम | भ.ज.(ब) | सरळसेवा |
| ४. | ५४१९ | श्रीमती मुपडे संजीवनी भाऊराव | अ.ज. | सरळसेवा |
| ५. | ५४६६ | श्री. प्रदिप मनोहर कुडळ | अ.ज. | सरळसेवा |
| ६. | ५४८९ | श्री. पी.एम. गड्डम | भ.ज.ब | पदोन्नत |
| ७. | ५५२० | श्री. डी.टी. पंधरे - | अ.जा. | पदोन्नत |
| ८. | ५५२३ | श्री चितळे .बी.जी. | अ.जमाती | पदोन्नत |
| ९. | ५५४० | श्री आयलनवार जि.एन. | भ.ज.ब. | पदोन्नत *(दिव्यांग) |
| १०. | ५५५१ | श्री. एस. डी. माने | भ.ज. (क) | पदोन्नत |
| ११. | ५५६० | श्री. एम. जी. खंडागळे | भ.ज.(ब) | पदोन्नत |
| १२. | ५५६७ | श्री. पी.एस. गायकवाड | अ.जा. | पदोन्नत |
| १३. | ५५७९ | श्री. आर. व्ही. शिंदे | अ.ज. | पदोन्नत |
| १४. | ५५८७ | श्री निलावाड यु. एस. | अ.ज. | पदोन्नत |
| १५. | ५६०२ | श्री. एम. आर. हरणे | भ.ज.(क) | पदोन्नत |
| १६. | ५६०३ | श्री. हंदेशवार एस. एन. | अ.ज. | पदोन्नत |
| १७. | ५६०४ | श्री. ए. पी. बोबडे | वि.मा.प्र. | पदोन्नत |
| १८. | ५६०५ | श्री. एस. डी. सुरे | भ.ज.(क) | पदोन्नत |
| १९. | ५६६६ | श्री.एस.के. खेडसकर | अ.जा. | पदोन्नत |
| २०. | ५६६९ | श्री. तू.वा. कोवे | अ.ज. | पदोन्नत |
| २१. | ५७०८ | श्री. राजेंद्र शंकरराव मोरे | अ.जा. | पदोन्नत |
| २२. | ५७१६ | श्रीम. माधुरी अशोक डोंगरे | इ.मा.व | सरळसेवा |

Scanned with CamScanner

| अ.क्र. | ज्ये. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | नियुक्ती |
|---|---|---|---|---|
| २३. | ५७१८ | श्री. हनुमंत पांडुरंग जगताप | खुला | सरळसेवा |
| २४. | ५७२० | श्री. जैयस्वाल सचिन शंकरलाल | इ.मा.व. | सरळसेवा |
| २५. | ५७२२ | श्रीमती. पारवे सुनंदा नरसू | खुला | सरळसेवा |
| २६. | ५७२३ | श्री. विजय शिवाजी बनसोडे | इ.मा.व. | सरळसेवा |
| २७. | ५७२४ | श्री. पाटील चेतन सर्जेराव | खुला | सरळसेवा |
| २८. | ५७२५ | श्रीम. शिल्पा रंगराव पाटील | खुला | सरळसेवा |
| २९. | ५७२९ | श्री.  अजय नानासो पाटील | खुला | सरळसेवा |
| ३०. | ५७३० | श्री.कदम शिवाजी बलभिम | खुला | सरळसेवा |
| ३१. | ५७३४ | डॉ.ढाकणे संदीप सुभाषराव | भ.ज.ड. | सरळसेवा |
| ३२. | ५७३५ | श्रीमती पाटील स्नेहलता विष्णू | खुला | सरळसेवा |
| ३३. | ५७३९ | श्री. अभिजीत शहाजी बारवकर | खुला | सरळसेवा |
| ३४. | ५७४० | श्री. योगेश कोटकर | खुला | सरळसेवा |
| ३५. | ५७४२ | श्री. अमित मुकुंदराव भोईटे | खुला | सरळसेवा |
| ३६. | ५७४३ | श्री.काळे हरिदास अशोकराव | खुला | सरळसेवा |
| ३७. | ५७४४ | श्रीम. ज्योती छबुराव गुंजाळ | इ.मा.व. | सरळसेवा |
| ३८. | ५७४६ | श्री.दिपक भिमराव गायकवाड | खुला | सरळसेवा |
| ३९. | ५७४७ | श्री. आबासाहेब आण्णासाहेब तांबे | इ.मा.व. | सरळसेवा |
| ४०. | ५७४८ | श्रीम. बबीता नारायणराव आळंदे | खुला | सरळसेवा |
| ४१. | ५७४९ | श्री.स्वप्नील यशवंत सोनवणे | भ.ज.(ड) | सरळसेवा |
| ४२. | ५७५१ | श्री. नाईक उध्दव बाळकृष्ण | खुला | सरळसेवा |
| ४३. | ५७५२ | श्री योगेश श्रीराम शिंदे | खुला | सरळसेवा |
| ४४. | ५७५३ | श्रीमती जांबळे पाटील प्रिया बापुराव | खुला | सरळसेवा |
| ४५. | ५७५४ | श्री. पठाण समशेर महम्मदखान | खुला | सरळसेवा |
| ४६. | ५७५५ | श्री. कदम निलेश नामदेव | खुला | सरळसेवा |
| ४७. | ५७५६ | श्री. गोंड ओमप्रकाश संभाजीराव | खुला | सरळसेवा |
| ४८. | ५७५८ | श्री. निंबाळकर दत्तात्रय रामचंद्र | खुला | सरळसेवा |
| ४९. | ५७५९ | श्री. विशाल नगराज सोनवणे | इ.मा.व. | सरळसेवा |
| ५०. | ५७६३ | श्री. राजमाने श्रीधर बाळकृष्ण | इ.मा.व. | सरळसेवा |
| ५१. | ५७६५ | श्री. दत्तात्रय गोरक्षनाथ जाधव | इ.मा.व. | सरळसेवा |
| ५२. | ५७६६ | श्री. सुरेश प्रभाकर वाघचौरे | इ.मा.व. | सरळसेवा |
| ५३. | ५७६८ | श्री. पवार विजय अर्जुन | खुला | सरळसेवा |
| ५४. | ५७६९ | श्रीमती लिना रघुनाथ खरात | भ.ज.क | सरळसेवा |

३.	उक्त नमूद अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) या पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटपाबाबत संदर्भ क्र.५ येथे नमूद करण्यात

Scanned with CamScanner

आलेली अधिसूचना विचारात घेऊन महसूली विभाग वाटपाचे व पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. उक्त नमूद नायब तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून तहसिलदार पदावर निव्वळ तात्पुरत्या तदर्थ स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे:-

१. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि. भरण्याबाबत सा.प्र.वि./१६ ब कार्यासनाच्या दि.७.५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, दिनांक ७.५.२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

२. सदर तदर्थ पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.

३. सरळसेवा कोटयातील रिक्त पदांवर तसेच प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या पदावर देण्यात आलेली निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची तदर्थ पदोन्नती ही ११ महिने किंवा सरळसेवेतील उमेदवार उपलब्ध होतील /प्रतिनियुक्तीवरील उमेदवार परत येतील यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील. व आवश्यकता भासल्यास दर ११ महिन्यानंतर तदर्थ पदोन्नती १ दिवस खंडीत करुन पुढे चालू ठेवली जाईल. यासाठी तदर्थ पदोन्नती १ दिवस खंडीत करुन पुढे चालू ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तथापि, असे आदेश निर्गमित झाले नाहीत तरीदेखील दर ११ महिन्यानंतर तदर्थ पदोन्नती १ दिवस खंडीत करुन पुढे चालू ठेवली गेल्याचे मानन्यात येईल.

दरम्यानच्या काळात सरळसेवेतील उमेदवार उपलब्ध झाल्यास/प्रतिनियुक्तीवरील उमेदवार परत आल्यास तदर्थ पदोन्नती झालेल्या अधिकाऱ्यास पदावनत करण्यात येईल. सदर तदर्थ पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात असून सदर पदावर संबंधित अधिकाऱ्याचा कायमस्वरुपी धारणाधिकार राहणार नाही.

३. सदर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या तदर्थ पदोन्नतीसाठी निवडसूची तयार करताना कोणताही ज्येष्ठ अधिकारी पदोन्नतीसाठी अनावधानाने राहून गेलेला नाही या धारणेच्या अधिन राहून सदर पदोन्नती राहील.

Scanned with CamScanner

४. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक दि.१७.०८.२०२२ अन्वये नायब तहसिलदार संवर्गाची दि.०१.०१.२०१५ ची राज्यस्तरीय एकत्रित अंतिम सेवाज्येष्ठता सूची सदर पदोन्नतीसाठी विचारात घेण्यात आली आहे. त्यामुळे सदर पदोन्नत्या या नायब तहसिलदार संवर्गातील नियमितीकरणामुळे, अंतिम ज्येष्ठतासूचीत होणा-या बदलाच्या अधीन असतील.

५. सदर पदोन्नतीच्या अनुषंगाने काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास व तहसिलदार संवर्गातील पदोन्नतीसाठी रिक्त पद उपलब्ध नसल्यास कनिष्ठतम अधिका-याला पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर पदोन्नती राहील.

६. संबधित अधिका-यांनी पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/ कार्यासन-१२ दि. १२.०९.२०१६ मधील नमूद तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

७. सदर पदोन्नती ही मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल मूळ अर्ज क्र.११००/२०१९ (श्रीमती सारिका कदम व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) या तसेच मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ येथे दाखल मूळ अर्ज क्र. ८८५/२०२२ (श्री. यशवंत पवार व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) त्याचबरोबर याव्यतिरिक्त मा.उच्च न्यायालय/मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून असेल.

८. सदर पदोन्नती दिव्यांग कर्मचा-यांना गट-अ व गट-ब मधील पदांवर पदोन्नतीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.२२.०७.२०२१ रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०५.०७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील व दि.२३.०७.२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये दिलेल्या सूचनांच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

९. पदस्थापनेनंतर संबंधित अधिकारी पदावर रूजू न झाल्यास, त्यांना पदोन्नतीबाबत स्वारस्य नसल्याचे समजून सामान्य प्रशासन विभागाच्या स्थायी आदेशानुसार निवडसूचीतून त्यांचे नाव वगळण्यात येईल. तद्नंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांची विनंती मान्य करता येणार नाही.

१०. तहसिलदार पदावरील पदोन्नती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

५. नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार संवर्गात पदोन्नत झालेल्या उपरोक्त अधिकाऱ्यांचे पदस्थापनेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित झाल्यानंतर व सदर पदावर रुजू होऊन कार्यभार

२१/१/२३

Scanned with CamScanner

स्विकारल्यानंतरच तहसीलदार (गट-अ) (वेतनश्रेणी एस-१९-५५१००-१७५१००) या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरित

**(डॉ. माधव वीर)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

सर्व विभागीय आयुक्त.

**प्रत,**

- मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
- मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
- मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
- मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
- अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
- सर्व जिल्हाधिकारी.
- प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
- सर्व अधिदान व लेखा अधिकारी.
- सर्व आहरण व संवितरण अधिकारी.
- अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
- सर्व संबंधित अधिकारी (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
- अवर सचिव (ई-४)/ कक्ष अधिकारी (ई-४अ/ ई-९), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
- निवडनस्ती (ई-३).

Scanned with CamScanner